**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**आदिवासी विकास केंद्र इमारतीसाठी विद्यापीठाला रुसा अंतर्गत २.५० कोटी रुपयाच्या निधीला मान्यता**
**पहिल्या टप्प्यात १.२५ कोटी रुपये मंजुर**
**आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुविधेत भर - कुलगुरू**

अमरावती.

रुसा योजनेतंर्गत इक्वीलीटी इनीशिएटीव्ह घटकांतर्गत संत गाडगे बाबा अरावती विद्यापीठाला आदिवासी विकास केंद्राच्या इमारत बाधकामाकरिता २.५० कोटी रुपयाच्या निधीला मान्यता मिळाली असून, त्यापैकी १.२५ कोटी रुपयाचा निधी विद्यापीठाला शासन निर्णयाद्वारे मंजुर केला आहे.

महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणाची गुणवत्ता, सर्वदूर संधी, समानता यासाठी केंद्र शासनाने तयार केलेल्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या अंतर्गत मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने निधी प्राप्त झाला आहे. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी शासनाने निधी दिल्याबद्दल आभार मानले आहे.

विद्यापीठ परिक्षेत्रात मेळघाट व यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी भागात आदीवासी बांधव मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यांच्या पाल्यांना उच्च शिक्षणाच्या संधी मिळाव्यात, समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांना आणता यावे, त्यांचा शैक्षणिक,सामाजिक व आर्थिक विकास व्हावा, या उद्देशाने उच्च शिक्षणाचे महत्व अधिक असून विद्यापीठाने केलेल्या प्रयत्नांमुळे त्यात मोलाची भर पडणार आहे.

१.२५ कोटी निधी अंतर्गत विद्यापीठात आदिवासी विकास केंद्र इमारतीचे निर्माण कार्य होणार असून, त्यामध्ये वसतीगृह व त्याअनुषंगीक सर्व सुविधा उपलब्ध होणार आहेत. आदिवासी विकास केंद्राच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास विद्यापीठाच्या माध्यमातून होण्यास फार मोठा हातभार लागणार असून लवकरच इमारतीचे बांधकामाला सुरुवात होणार आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २७/११/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी